**University of Mumbai**

**No. AEM./Admission/(2022-23)/ 310 / of 2022**

## परिपत्रक

मुंबई विद्यापीठाशी संलग्नित/संचलित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य/मान्यताप्राप्त संस्थांचे संचालक, संचालक उपपरिसर (ठाणे, रत्नागिरी व सिंधुदुर्ग) यांना कळविण्यात येते की, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या परिपत्रक क्रमांक: संकीर्ण२४१६/प्र.क्र. २६/१६/प्रशा-५, दिनांक १० फेब्रुवारी,२०१६ अन्वये शासकीय कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्था इत्यादी शासकीय संस्थांमध्ये कागदपत्रांच्या सांक्षांकित प्रती ऐवजी स्वयंसाक्षांकित प्रती स्वीकृत करण्यासंदर्भातील निर्देशांचे काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले आहेत.(प्रत संलग्न)

तरी सदरची बाब ही सर्व संबंधित महाविद्यालयांचे प्राचार्य, विद्यार्थी व प्रवेश प्रक्रियेशी संबंधित सर्वांच्या निदर्शनास आणुन दयावी व शासन निर्देशांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

ठिकाण : मुंबई - ४०००९८
दिनांक : ०९ जुन, २०२२

संचालक
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी -
मुंबई विद्यापीठाशी संलग्नित/संचलित सर्व कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयांचे प्राचार्य व मान्यताप्राप्त संस्थांचे संचालक, संचालक उपपरिसर (ठाणे, रत्नागिरी व सिंधुदुर्ग)

विविध सेवाकरिता शपथपत्राऐवजी स्वयंघोषणापत्र (Self- Declaration ) व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रतीऐवजी स्वयंसाक्षांकित प्रती (Self -Attested Copies ) स्वीकारण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
**शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण २४१६/प्र.क्र.२६/१६/प्रशा-५**
४ था मजला, मंत्रालय विस्तार इमारत, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
तारीख: १० फेब्रुवारी, २०१६

## शासन परिपत्रक

शासकीय कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्था इत्यादी शासकीय संस्थांमध्ये विविध दाखले, अनुज्ञप्ती व इतर शासकीय सेवा/सुविधा प्राप्त करुन घेण्याकरीता नागरीकांना शपथपत्र तसेच मूळ प्रमाणपत्रे/कागदपत्रे यांच्या राजपत्रित अधिकारी/विशेष कार्यकारी अधिकारी इत्यादी सक्षम अधिकाऱ्यांनी साक्षांकित केलेल्या प्रती सादर कराव्या लागतात. परिणामी नागरीकांची गैरसोय होते. ही गैरसोय दूर करण्याकरीता प्रचलित कार्यपध्दती अधिक सुलभ करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून शासकीय कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्था इत्यादी शासकीय संस्थांमध्ये शपथपत्र ऐवजी स्वयंघोषणापत्र व प्रमाणपत्रे /कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती ऐवजी स्वयंसाक्षांकित प्रती स्वीकृत करण्यासंदर्भात सामान्य प्रशासन विभागाने शासन निर्णय क्रमांक प्रसुधा १६१४/३४५/प्र.क्र.७१/१८-अ, दिनांक ०९.०३.२०१५ अन्वये निर्देश दिले आहेत (प्रत संलग्न). सदर निर्देशाच्या अनुषंगाने **या विभागाच्या अधिपत्याखालील कार्यालयांमध्ये शासकीय सेवा सुविधाकरीता तसेच शासन अनुदानित /विनाअनुदानित खाजगी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शैक्षणिक संस्थामध्ये विद्यार्थ्यांच्या प्रवेशासंदर्भातील व इतर तद्नुषंगिक बाबींसंदर्भातील विविध सेवाकरीता शपथपत्राऐवजी स्वघोषणापत्र (Self -Declaration) व प्रमाणपत्रे/कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती ऐवजी स्वयंसाक्षांकित प्रती (Self -Attested Copies) स्वीकारण्यात याव्यात.**

२. सदर स्वयंघोषणापत्र व स्वयंसाक्षांकित प्रती स्वीकारतांना उक्त नमूद सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ०९.०३.२०१५ च्या शासननिर्णयातील निर्देशांचे काटेकोरपणे पालन करावे.

३. नागरिक/शिक्षक /शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी /पालक यांना कोणत्या बाबींसाठी अधिनियम /नियमानुसार **अर्जासोबत शपथपत्र सादर करणे आवश्यक आहे आणि कोणत्या बाबींसाठी अर्जासोबत शपथपत्र बंधनकारक नाही,** याची तपशीलवार यादी तयार करुन, सदर यादी संबंधित कार्यालयांमध्ये /शैक्षणिक संस्थांमध्ये प्रसिध्दी फलकावर नागरीकांच्या /विद्यार्थ्यांच्या / पालकांच्या माहितीकरीता प्रसिध्द करण्यात यावी.

४. प्रस्तुत परिपत्रक राज्यातील सर्व शासकीय कार्यालये/शासन अनुदानित/ विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित खाजगी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शैक्षणिक संस्थांच्या निदर्शनास आणून त्याप्रमाणे कार्यवाही करण्याचे निर्देश सदर कार्यालयांना/संस्थांना देण्यात यावेत.

५. **तसेच प्रस्तुत परिपत्रकास व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी.**

६. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१६०२१०१४५०३५२३२१ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ravindra Pralhad Ate

Digitally signed by Ravindra Pralhad Ate
Date: 2016.02.10 15:01:21 +05'30'

(र. प्र. आटे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
२) शिक्षण संचालक (अल्पसंख्यांक व प्रौढ शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे
४) संचालक, महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.
५) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे
६) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे.
७) प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक तंत्रज्ञान संस्था, पुणे.
८) विभागीय शिक्षण उपसंचालक, सर्व
९) मा. अपर मुख्य सचिव (प्र.सु.र.व का.), सामान्य प्रशासन विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१०) निवडनस्ती (प्रशा-५).

शासकीय सोयी /सुविधाकरिता शपथपत्राऐवजी स्वघोषणापत्र व कागदपत्रांच्या स्वयंसाक्षांकित प्रती स्विकारणे.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांकः प्रसुधा १६१४/३४५/प्र.क्र.७१/१८-अ
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: ०९ मार्च, २०१५

वाचा :- १) माहिती तंत्रज्ञान, सामान्य प्रशासन विभाग , शासननिर्णय क्र. MH- ९०२१ /११/२०१३ - DIT (MH)/ ३९ दिनांक १४/०८/२०१३.
२) माहिती तंत्रज्ञान, सामान्य प्रशासन विभाग, शासन शुध्दीपत्रक क्र. MH- ९०२१ /११/२०१३ - DIT (MH)/ ३९ दिनांक १५/१०/२०१३.

प्रस्तावना -

शासकीय कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्था इ. शासकीय संस्थांकडून नागरिकांना विविध अनुज्ञप्ती, दाखला व शासकीय सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतात. याकरिता अर्जासह विहित नमुन्यातील शपथपत्रे सादर करावी लागतात. तसेच मुळ कागदपत्रांच्या राजपत्रित अधिकारी / विशेष कार्यकारी अधिकारी /इतर सक्षम अधिका-यांनी साक्षांकित केलेल्या प्रती सादर कराव्या लागतात. यामुळे नागरिकांना होणारी असुविधा दूर करण्यासाठी शासकीय कार्यालयांमध्ये शपथपत्र, प्रमाणपत्र तसेच साक्षांकित प्रती ऐवजी शक्य तेथे स्व घोषणा प्रमाणपत्र तसेच स्वयंसाक्षांकित प्रती स्विकृत करण्याची एक कार्यपध्दती अंमलात आणण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे.

शासन निर्णय -

महाराष्ट्र शासनाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय कार्यालये, स्थानिक स्वराज्य इत्यादि शासकीय संस्थामध्ये विविध दाखले, अनुज्ञप्ती व इतर शासकीय सेवा / सुविधा प्राप्त करुन घेण्याकरिता नागरिकांना सादर करावे लागणारे शपथपत्र (Affidavit), तसेच मुळ प्रमाणपत्रे/ कागदपत्रे यांच्या राजपत्रित अधिकारी/ विशेष कार्यकारी अधिकारी इत्यादी. सक्षम अधिकाऱ्यांनी साक्षांकित केलेल्या प्रती (Attested copies) सादर कराव्या लागतात. परिणामी नागरिकांची गैरसोय होते. ही गैरसोय दूर करण्याकरिता प्रचलित कार्यपध्दती अधिक सुलभ करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

**संदर्भाधीन शासन निर्णय अधिक्रमित करुन सर्व शासकीय कार्यालये, स्थानिक स्वराज्य इत्यादि शासकीय संस्थामध्ये शपथपत्र (Affidavit), ऐवजी स्वयं घोषणापत्र (Self Declaration) व प्रमाणपत्रे / कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती (Attested copies) ऐवजी स्वयंसाक्षांकित प्रती ( Self Attested Copies) स्वीकृत करण्या संदर्भात पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत -**

अ) **शपथपत्र (Affidavit) ऐवजी स्वयं घोषणा पत्र (Self-Declaration) स्विकारणे** - शासकीय कामकाज तसेच सेवा/ सुविधांकरिता अनेक शासकीय कार्यालयांकडून अर्जासह शपथ पत्राची मागणी करण्यात येते. जेथे जेथे विद्यमान कायदा/ नियम

याव्दारे शपथपत्र अर्जासह सादर करणे आवश्यक आहे. तेथे शपथ पत्र सादर करणे आवश्यक राहील. मात्र जेथे अशा प्रकारे शपथपत्र बंधनकारक नाही. तेथे शपथ पत्राची मागणी करण्यात येऊ नये. त्या सर्व प्रकरणी शपथपत्राऐवजी स्वघोषणापत्र (Self Declaration) घेण्यात यावे. स्वघोषणापत्र प्रपत्र -अ॰ प्रमाणे राहील.

ब) **मुळ प्रमाणपत्रे/ कागदपत्रे यांच्या** (Attested copies) **साक्षांकित प्रतीऐवजी स्वयं साक्षांकित प्रती** ( Self Attested Copies) **स्वीकारणे :-**

शासकीय कामकाज तसेच शासकीय सेवा / सुविधा करिता अर्जासह मुळ प्रमाणपत्रांच्या/ कागदपत्रांच्या प्रती राजपत्रित अधिकारी / विशेष कार्यकारी अधिकारी /इतर सक्षम अधिका-यांनी साक्षांकित केल्यानंतर स्विकारल्या जातात. जेथे जेथे विद्यमान कायदा / नियम याव्दारे अशा साक्षांकित प्रतींची आवश्यकता आहे. तेथे अशा साक्षांकित प्रती सादर करणे आवश्यक राहील. मात्र जेथे अशा प्रकारे साक्षांकन बंधनकारक नाही त्या सर्व प्रकरणी स्वयं साक्षांकित प्रती स्विकारण्यात याव्यात. तेथे साक्षांकित प्रतींची मागणी करण्यात येऊ नये. मात्र स्वयंसाक्षांकित प्रतीसह त्यांच्या सत्यतेबाबत स्वघोषणापत्र सोबत जोडलेल्या प्रपत्र - ब प्रमाणे घेण्यात यावे.

क) **वरील दोन्ही स्वघोषणापत्रे साध्या कागदावर करता येतील त्याकरिता न्यायिक कागदाची आवश्यकता नाही.**

ड) स्वघोषणा प्रमाणपत्रावर नागरिकाने जर चुकीची / खोटी माहिती दिल्यास त्याबाबत संबंधित नागरिकावर भा.दं.वि. मधील तरतूदी तसेच इतर अधिनियमातील तरतूदीनुसार योग्य ती कारवाई केली जाईल, असा स्पष्टपणे उल्लेख विहित नमुन्यातील अर्जामधील अटी व शर्तीमध्ये करण्यात यावा.

इ) स्व घोषणा प्रमाणपत्रावर संबंधित नागरिकाचे सुस्पष्ट तसेच अलिकडच्या काळातील छायाचित्र (फोटो) असावे. उपलब्ध असल्यास त्यावर संबंधित नागरिकाचा आधार क्रमांक देखील नमूद करण्यात यावा.

३. नागरी सुविधा केंद्र

अ) राज्यातील सर्व नागरीक सुविधा केंद्र, महा-ई-सेवा केंद्र, सेतु केंद्र इ. केंद्रामध्ये वरील परि. २) प्रमाणे स्वघोषणा पत्र व कागदपत्रांच्या स्वयंसाक्षांकित प्रती व त्यांच्या सत्यतेबाबत स्वघोषणा पत्र स्विकारण्याची कार्यवाही करावी.

ब) शपथपत्राऐवजी स्वघोषणा पत्र व स्वयंसाक्षांकितप्रती संदर्भात स्वघोषणा पत्र हे अर्जाचाच भाग राहतील ते साध्या कागदावर घेण्यात यावे त्यासाठी न्यायिक कागदाची आवश्यकता नाही.

क) नागरी सुविधा केंद्र महा-ई-सेवा केंद्रामार्फत देण्यात येणा-या सेवांकरिता विकसित केलेल्या संगणकीय प्रणालीमध्ये महा ऑनलाइनने आवश्यक त्या सुधारणा कराव्यात व त्याचा अहवाल माहिती तंत्रज्ञान विभागास तात्काळ सादर करावा.

४. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिनस्त कार्यालयांना वरीलप्रमाणे कार्यवाही करण्याचे निर्देश त्वरीत द्यावेत.

५. हा शासन निर्णय माहिती व तंत्रज्ञान, सामान्य प्रशासन विभाग यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

६. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१५०३०९१८२५००२७०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Prem Singh Meena

Digitally signed by Prem Singh Meena
DN: c=IN, o=all india services, ou=IAS, postalCode=110003, st=New Delhi, cn=Prem Singh Meena
Date: 2015.03.09 18:36:50 +05'30'

(डॉ. पी. एस. मीना)
अपर मुख्य सचिव (प्र.सु. र. व का.)

प्रत,

१) मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधानपरिषद.
२) सर्व सन्माननीय विधानसभा, विधानपरिषद व संसद सदस्य,
३) मा. राज्यपालांचे सचिव (५ प्रती),
४) मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव (५ प्रती),
५) सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,
६) संचालक, माहिती तंत्रज्ञान,
७) सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव / स्वीय सहायक,
८) मुख्य सचिवांचे वरीष्ठ स्वीय सहायक,
९) मा. महाअधिवक्ता, महाराष्ट्र राज्य,
१०) प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
११) प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
१२) प्रबंधक , लोकायुक्त व उप लोकायुक्त यांचे कार्यालय,
१३) सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई,
१४) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१५) उप सचिव, विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय, विधान भवन, मुंबई,
१६) उप सचिव, राज्य माहिती आयोग यांचे कार्यालय, मुंबई,
१७) सर्व विभागीय आयुक्त,
१८) सर्व जिल्हाधिकारी,
१९) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२०) सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख /
२१) प्रादेशिक प्रमुख / कार्यालय प्रमुख,
२२) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई (५ प्रती),
२३) निवड नस्ती.